नि.फौ.केस क्र.१६५५/२०१५
सरकार वि. अबू बखर
**निशानी क. १७**

साक्षिदार क्रमांक १ ची सरतपासणी

खुदाकी कसम सच कहता हू,

नाव : सिराजूद्दीन याद अली अंसारी,
वय : ५४ वर्षे व्यवसाय : सेवानिवृत्त,
राह. : नागपुर

**सरतपासणी सरकारी वकील श्रीमती आर एम मेहर तर्फे**

मी मौजा वांजरा मध्ये खसरा नं १०९, समालोचन एकता हाउसिंग सोसायटी मधील प्लॉट नं २९३ आणि ३१० श्रीमती शोभा चौधरी कडून विकत घेतले होते. ते प्लॉट्स मी रु ३,५०,०००/- मध्ये दि. १४.०२.२०१४ रोजी विकत घेतले होते. त्या प्लॉट संबंधी श्रीमती शोभा चौधरीने मला वठ मुख्त्यारपत्र करुन दिले होते. सदर मुख्त्यारपत्र नोंदनीकृत होते. मला आता प्रकरणातील वठमुख्त्यारपत्र दाखविले. सदर मुख्त्यारपत्र मला श्रीमती शोभा चौधरीने करुन दिलेले आहे. त्यावर माझी, शोभा चौधरीची फोटो आणि सही आहे. त्यावर साक्षदार नात्याने शोभा चौधरीचा मुलगा अभिजितची सही आहे. तसेच शकील अहमदची साक्षदार नात्याने सही आहे. मुख्त्यारपत्रातील मजकूर बरोबर आहे. सदर मुख्त्यारपत्रास **नि. १८** देण्यात येते. प्लॉट्स विकत घेण्यापूर्वी मी शोभा चौधरीच्या नावे असलेल्या खरेदीखत पाहिले. प्लॉटचे इतर कागदपत्र पाहिले. शोभा चौधरी व तीच्या मुलाकडे पूर्ण चौकशी केली. प्रकरणातील शोभा चौधरीच्या नावे असलेले प्लॉट नं २९३ चे खरेदीखत मला दाखविले. त्यावर शोभा चौधरीची सही आहे. खरेदीखतासोबत कब्जापत्र आहे. त्यावर शोभा चौधरीची सही आहे. सदर खरेदीखतास **नि. १९** देण्यसात येते. प्रकरणातील शोभा चौधरीच्या नावे असलेले प्लॉट नं ३१० चे खरेदीखत मला दाखविले. त्यावर शोभा चौधरीची सही आहे. खरेदीखतासोबत कब्जापत्र आहे. त्यावर शोभा चौधरीची सही आहे. सदर खरेदीखतास **नि. २०** देण्यसात येते. माझया नावे मुख्त्यारपत्र करुन देतेवेळी दोन्ही प्लॉट संदर्भात कब्जापत्र करुन दिला होता. मला आता प्रकरणातील कब्जापत्र दाखविले. त्यावर माझी, शोभा चौधरीची फोटो आणि सही आहे. त्यावर साक्षदार नात्याने शोभा चौधरीचा मुलगा आणि शकील अहमदची सही व फोटो आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर

कब्जापत्रास **<u>नि. २१</u>** देण्यात येते. प्लॉटचा कब्जा मिळाल्या नंतर मी त्यावर टीन शेडचे झोपडे बांधले.

त्यानंतर काही दिवसातच आरोपी क्र. २ प्लॉट मध्ये आला आणि त्यावर त्याचे मालकी हक्क सांगू लागला. सोबत आरोपी क्र. १ आला होता. मी आरोपी क्र. १ व २ ला मालकी हक्कासंबंधी कागदोपत्री पुरावा दाखविण्यास सांगीतले. आरोपी क्र. १ व २ ने मला प्लॉटचे नोंदणीकृत खरेदीखत दाखविले. ते खरेदीखत मी पाहिले. ते खरेदीखत सन-२०११ चे होते. त्यामध्ये आरोपी क्र. १ चे वय ३५ लिहीले होते परंतू आरोपी क्र. १ सेवानिवृत्त व्यक्ती आहे. त्या खरेदीखतामध्ये खरेदी देणार व घेणार यांचे फोटो नव्हते. मी त्यानंतर शोभा चौधरीचा मुलगा अभिजितला सांगून त्या खरेदीखताची सर्टीफाईड काढून घेतली. सदर तथाकथीत खरेदीखत मध्ये लिहून देणारच्या कॉलममध्ये शोभा चौधरीचा फोटो नसून तो फोटो दुस-या स्त्रीचा आहे. तसेच त्यामध्ये शेख मेहबूब पेंटरच्या नावाने मतदान ओळखपत्र लावलेले आहे. त्यामध्ये फोटो आरोपी क्र. २ चा लावलेला आहे. एकंदरीत खरेदीखत पाहून मला संशय आला. सदर खरेदीखतास **<u>नि. २२</u>** देण्यात येते. मी या संदर्भात चौकशीसाठी समालोचन एकता हाउसिंग सोसायटी मध्ये गेलो. सोसायटीच्या लोकांनी नि. २२ सोबत दाखल असलेले नाहरकत प्रमाणपत्र सोसायटीने दिले नसल्याचे सांगीतले आणि ते प्रमाणपत्र बोगस असल्याचे सांगीतले. खरेदीखतासोबत करपावती लावलेली होती. मी महानगरपालीका मध्ये जावून त्या संदर्भात चौकशी केली. ती कर पावती बोगस आढळली.

आरोपी लोक मला प्लॉट वर न येण्यासंबंधी दबाव टाकू लागले. मी शेवटी कळमना पोलीस ठाण्यात तक्रार केली. मला आता तक्रार दाखविली. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तक्रारीस **<u>नि.२३</u>** देण्यात येते. मला आता एफआयआर दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. एफआयआर यास **<u>नि. २४</u>** देण्यात येते. नि. २३ ची तक्रार देण्यापूर्वी मी वरीष्ठ पोलीस अधिका-याकडे तक्रार केली होती. त्याची प्रत मी पोलीसांना दिली होती. मला आता त्या तक्रारीची प्रत दाखविली. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **<u>नि. २५</u>** देण्यात येते. अशाप्रकारे मला आरोपीने फसविले.

सरतपास संपला.

**आरोपी क्र. १ व २ तर्फे उलटतपास श्री.मुज्जमिल हूसैन वकील.**

हे म्हणने खरे नाही की, ज्यावेळी आरोपी क्र. १ व २ प्रथमत: माझया कडे प्लॉट वर आले त्यावेळी आरोपीला माहिती झाले की, प्लॉटचे खरेदीखत माझया नावावर झालेले आहे. मला माहिती नाही की, आरोपी क्र. १ ने आरोपी क्र. ३, ४ व इतर लोकांविरुद्ध त्याला करुन दिलेल्या खरेदीखतामध्ये फसवेगिरी झाल्याची तक्रार पोलीसांना दिली आहे किंवा कसे. हे म्हणने खरे नाही की, शोभा चौधरी कडून मला माहित पडले की, तीने आरोपी क्र. ४ ला प्लॉट्चे कागदांची झेरॉक्स प्रत दिली होती. हे म्हणने खरे नाही की, आरोपी क्र. ४ कडून मला माहित झाले की, दिनांक ०३.०६.२०११ रोजी त्याने आरोपी क्र. ३ ला सदर दोन्ही प्लॉटचे विक्री करारनामा रक्कम रु २,०४,०००/- मध्ये करुन दिला होता. हे म्हणने खरे नाही की, आरोपी क्र. ३ कडून मला महिती पडले की, दिनांक ११.०६.२०११ रोजी त्याने दोन्ही प्लॉट संदर्भात आरोपी क्र. १ ला विक्री करारपत्र करुन दिला आहे.

नि. १९ व २० वर खरेदी देणार आणि घेणार यांचे फोटो नाहीत. मागील १० वर्षा पासून कोणताही दस्त नोंदणीकृत करतेवेळी नोंदणी कार्यालयात संबंधीत पार्टी लोकांची वेबकॅमे-या द्वारे फोटो काढले जातात आणि दस्त सोबत जोडले जातात. नि. २२ च्या खरेदीखतामध्ये आरोपी क्र. १ ची वेबकॅमे-याद्वारे काढलेली फोटो आणि त्याची सही आहे. मला आता नि. २२ मधील दस्त गोषवारा भाग २ दाखविण्यात आला. त्यावर दोन फोटो आहेत. खालील फोटो आरोपी क्र. २ चा आहे. आरोपी क्र. २ ची सही व अंगठयाचा ठसा देखील आहे. नि. २२ चा दस्त नोंदणी कार्यालयात नोंदणीकृत करण्यात आला आहे. हे म्हणने खरे नाही की, आरोपी क्र. ३ ने आरोपी क्र. १ ला प्लॉटचे खरेदीखत करुन दिल्याची बाब मला माझे खरेदीखत करण्यापूर्वी पासून माहिती होती. हे म्हणने खरे नाही की, आरोपी क्र. ३ ने आरोपी क्र. २ चा फोटो घेवून त्याचा गैरवापर केला. हे म्हणने खरे नाही की, नि. २२ मध्ये आरोपी क्र. १ चे वय टंकलेखनात चूक झाल्याने वय ३५ लिहीले गेले आहे. हे म्हणने खरे आहे की, आरोपी क्र. १ ने माझया विरुद्ध प्लॉट संदर्भात दिवाणी दावा दाखल केला होता. हे म्हणने खरे नाही की, आरोपी क्र. १ व २ स्वत: फसविले गेले आहेत . हे म्हणने खरे नाही की, मी आरोपी क्र. १ व २ विरुद्ध खोटी तक्रार दाखल केली आहे.

उलट तपास संपला.

**आरोपी क. ३ तर्फे उलटतपास आरती सिंग वकील.**

नि. २८ च्या अर्जावरुन उलट तपास तहकूब.

**आरोपी क. ४ तर्फे उलटतपास श्री.मेश्राम वकील.**

मी आरोपी क. ४ ला ओळखत नाही. आरोपी क. ४ सोबत माझा व्यवहार झालेला नाही.

उलट तपास संपला.

फेरतपास : काही नाही.

वा.दा.ब.अ.सा.

(ए.ओ.जैन)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
कोर्ट नं. ३, नागपूर.

दि. १६.११.२०१७